# मुलाखत

# सतीश जाधव यांची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत

ज्या लेखकाचा आपण अभ्यास करतो, त्या लेखकाला प्रत्यक्ष भेटून त्याच्याशी त्याच्या लेखनासंबंधी व एकूणच वाङ्मयाविषयी चर्चा करणे हा दुर्लभ योग असतो. लेखक श्री सतीश जाधव यांनी दिलेली मुलाखत ही अभ्यासकाच्या व वाचकांच्या दृष्टीनेही महत्त्वाची ठरावी. साहित्यातील विविध प्रश्नांसंबंधी त्यांनी नोंदविलेली आपली मते ही त्यांच्या साहित्यावर व एकूणच वाङ्मयावर प्रकाश टाकणारी आहेत.

प्रश्न - आपले मूळ गाव कोणते?

उत्तर - उंब्रज. माझं बालपण तिथेच गेले आहे. तिथे आमचं 'घर' आहे.

प्रश्न - आपले शिक्षण कोठे झाले?

उत्तर - माझे शालेय शिक्षण उंब्रज येथे झाले आहे. अकरावी-बारावी पर्यंतचे शिक्षण यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज, सातारा येते तर 'बी.एस्सी.' कोकण कृषी विद्यापीठ दापोली येथे झाले. एम.एस्सी. ची पदवी 'राहुरी' येथून प्राप्त केली.

प्रश्न - आपण लेखनाला कधी सुरूवात केली?

उत्तर - 'उंब्रज' या ठिकाणी शाळेला असताना निबंध लिहिण्याचा छंद जडला आणि यातूनच मी निबंध लिहिता लिहिता कथा, कादंबरी लेखनाकडे वळलो.

प्रश्न - तुमचे आवडते लेखक कोण आहेत? आणि ते का आवडतात?

उत्तर - माझे आवडते लेखक वि.दा.सावरकर, डॉ.आनंद यादव, विश्वास पाटील, इंद्रजीत भालेराव, राम गणेश गडकरी, पु.ल.देशपांडे असे कितीतरी ज्ञानाबरोबर हसवून आनंद देणारे लेखक मला आवडतात.

प्रश्न - कादंबरी, नाटक, कथा या फॉर्ममध्ये तुम्ही लेखन केलंत यातला कुठला फॉर्म तुम्हाला अधिक आवडतो?

उत्तर - 'कादंबरी' हा माझा सर्वात आवडता लेखन प्रकार आहे.

प्रश्न - आपले भविष्यकालीन लेखनविषयक संकल्प काय आहेत?

उत्तर - माझ्या 'झळ' व 'बळ' या दोन ग्रामीण कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. त्याचबरोबर एक कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. एक कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. एकांकिकेचे एक पुस्तक मी प्रकाशित करणार आहे.

प्रश्न - नाटक, आत्मचरित्र लिहायचा विचार आहे का?

उत्तर - आत्मचरित्र लिहायचा माझा विचार नाही. मात्र 'खुर्ची' हे राजकीय विषयावर आधारीत नाटक लिहिलेले आहे. प्रथम रंगमंचावर आणण्याचा मानस असून त्यानंतरच ते प्रकाशित करणार आहे.

प्रश्न - आपल्या लेखनापाठीमागे कोणाची प्रेरणा आहे?

उत्तर - लेखन केवळ प्रेरणेने होते असे मला वाटत नाही. ती वस्तू मुळातच आपल्याजवळ असावी लागते. लेखकाला आतूनच लिहावेसे वाटते. सांगावेसे वाटते. प्रेरणेने जिद्द, आत्मविश्वास, उत्तेजन इत्यादी गोष्टी मिळतात. त्या मला माझ्या आई-वडिलांकडून मिळाल्या.

प्रश्न - आपल्या 'झळ' व 'बळ' या दोन्ही ग्रामीण कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये कोणती?

उत्तर - साधारणपणे आपण जर पाहिलं तर एखाद्या लेखकाने कादंबरी पूर्ण केल्यानंतर तो आपल्या नातेवाईकांना ती समर्पित करतो पण मी माझ्या दोन्ही कादंबऱ्या निसर्गाला अर्पण केल्या आहेत.

प्रश्न - आपले वाचन, आदर्श, संस्कार याविषयी सांगा.

उत्तर - मी साधारणतः सर्व तऱ्हेचे वाचतो. कथा, कादंबऱ्या, नाटक, वैचारिक, चरित्रे, अध्यात्मिक वगैरे.माझे आई-वडीलच माझे आदर्श आहेत. लहानपणी ते मला उत्तम गीते ऐकवीत कीर्तनाला नेत व प्रसिध्द वक्त्यांची व्याख्याने ऐकायला सांगत हे संस्कार करण्याचे फार मोठे श्रेय माझ्या मातापित्यांना आहे.